श्रीशिवराज्याभिषेक

# पोवाडा ———————— :१२:

छत्रपती की जय । छत्रपती की जय । श्री शिव छत्रपती की जय । दऱ्याखोऱ्यांतुन सह्यगिरीच्या भरला जयजयकार । वृक्ष डोलती, नद्या उसळती, नाचति अपरंपार ॥ जी ॥ रानफुलांचा सडा पसरुनी वेली डोलती हवेवरी । पशुपक्षीही आनंदानं ललकारित ते गडावरी ॥ जी ॥

● ●

## चौक १ ला

बारा वर्षांचा शिवबा झाला घेतली शपथ दारुण । रोहिडेश साक्षी ठेवुन प्रतिज्ञा केली राज्य स्थापिन ॥ जी ॥ चाल ॥ खळ दुर्जन संहारुन । करिन सज्जनांचं रक्षण ॥ जी ॥ चाल ॥ जिजाइनं प्रेरणा दिली बाळ शिवबाला ॥ शहाजीनं मोठ्या शर्थीनं पाया घातला ॥ मित्रांनीं जीव ओवाळून वरुन टाकला ॥ जी ॥ शिवाजीनं सावधानपणें व्यूह मोडला ॥ गडामागुन गड घेऊन पाय रोवला ॥ जी ॥ चाल ॥ तोरणा घेऊन तोरण बांधुन सुरवात केली राज्याची । पुण्याई सारी एक होऊन अवतरली महाराष्ट्राची ॥ जी ॥ कटाव ॥ खजिना कल्याणहून चालला । जात होता तो विजापूराला । बोरघाटांतच सारा लुटला । प्रतापगडला विजय मिळविला । पन्हाळगडचा वेढा लढविला । शाहिस्त्याचा काटा काढला । राजा गेला मग आग्ऱ्याला । तिथं शत्रूनं फास टाकला । कैद केलं श्रीशिवरायाला । पण पेटाऱ्यांतून निसटून गेला । किल्ल्यांमागुन किल्ले घेऊन । राज्याचा विस्तारच केला ।

एका कोंबांतून कोंब दुसरा । त्यांतुन तिसरा । त्यांतुन चौथा । असे पाठोपाठ अंकूर यावे । पल्लवशाखा । फुलें फळेंही त्यांतुन सारे बाहेर पडती । वृक्ष दिसे मग नयनमनोहर ॥ शिवराजानें बीज लाविलें । अंकूर फुटले । वाढत गेले । हळू हळू मग राज्यवृक्ष हा चारी बाजूनं फुलतच गेला ॥ चाल ॥ निर्भय केलं सर्वाला । प्रेमाचं छत्र जनतेला ॥ जी ॥ सुखी केलं महाराष्ट्राला ॥ आईची माया जनतेला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ जनतेचं सौख्य तें सौख्य झालं राजाला ॥ जी ॥ जनतेचं दुःख तें दुःख गांजतें त्याला ॥ जी ॥ जनतेचा आनंद तोच आनंद त्याला ॥ जी ॥ जनतेचं रक्षण हेंच वेड जीवाला ॥ जी ॥ असा राजा शिवाजी आवडता सर्वाला ॥ चाल ॥ राज्याभिषेकाचा केला मोठा सोहळा । तो आता वर्णीन ऐका पुढच्या चौकाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

शके १५९६ आनंद संवत्सर । ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी (तेराव्या) तिथीला होता शनिवार ॥ जी ॥ सूर्योदयाच्या आधीं धरला तीन घटकांचा सुमुहुर्त । तयारी केली अभिषेकाची हर्ष मावेना गगनांत ॥ जी ॥ चाल ॥ क्षीरवृक्षाचें सुवर्णमंडित । सव्वा हात उंच केलें आसन । वरती बसले शहाजीनंदन । सोयराबाई शोभे बाजुला । पुत्र संभाजी जवळ बसला । अष्टप्रधान आठी बाजुला । कलश सोन्याचे हातीं घेऊन । उभे राहिले आठ दिशेला । पूर्वदिशेला मोरोपंतांनीं तूपकलश हातीं धरला । रामचंद्रानीं दहीकलशानं शोभा आणली पश्चिमेला ॥ हातीं घेऊन मधुकलशाला रघुनाथ पंडित उत्तरेला । दुग्धकलश हंबीररावांनीं दक्षिणेस हातीं धरला ॥ चाल ॥ अण्णाजी दत्तो आग्नेयीला । जनार्दन पंडित नैर्ऋत्येला । बाळाजी आवजी वायव्येला । बाळाजी पंत ईशान्येला ॥ चाल ॥ तयारी झाली मुहूर्त आला वाजत गाजत



त्यावेळा । गागाभट्टांच्या वेदमंत्रांनीं रायगड सारा दुमदुमला ॥ चाल ॥ वेद मंत्रांचा घोष चालला । पुण्यनद्यांचें पाणी आणलें । सागरजळ मंगल आणविलें । आम्रपल्लवें सिंचन केले । एक सुलक्षणी घोडा आणिक हत्ती तेथें उभे राहिले । धम् धम् धम् धम् वाजत भेरी । गोड तुतारी । सनई सुंदर । कुंइ कुंइ कुंइ कुंइ शिंग वाजलें । कर्णे वाजले । नौबत झडली । धडम् धडम् धडधडत चौघडा । १०८ तोफांचा धडाका । आठ दिशांना देतो धडका । सुवासिनी पंचारती करिती । तोरणमाळा मंद डोलती ॥ चाल ॥ महाराष्ट्राचें मंगल सारे सगुण रूपानं अवतरले । धन्य रायगड, धन्य सोहळा धन्य पाहणारे झाले ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

३ खंडी ३२ शेर ३२ मासे सोने घेऊन तयार केलें सिंहासन ॥ जी ॥ चाल ॥ रत्नजडित सिंहासन । वरती शोभे जिजानंदन ॥ जी ॥ चाल ॥ जणुं नक्षत्रें खालीं उतरलीं झगमग झगमग करणारीं । रायगडावर वसती केली सिंहासनाच्या सभोंवरीं ॥ जी ॥ मेघावरती बसुनी आला इंद्र देव तो गिरीवर । झिम झिम झिम झिम सिंचुनि पाणी करि अभिषेका गडावर ॥ जणु किरणांचें पाणी करुनी चंद्र वर्षतो गडावर । निसर्ग फुलला डोलुं लागला शिवास पाहुन घरेवर ॥ जी ॥ लाल रंगाचे कपडे भरजरी शिवरायाच्या अंगांत । वैभव आणि वैराग्य शोभले अशी न शोभा दुनियेंत ॥ जी ॥ चाल ॥ कैकांचा सन्मान केला । भरजरी वस्त्र कितिकांला । शिरपेंच कैकांला दिला । मानाच्या तलवारी दिल्या कैक वीराला । हजारों होन खर्चिले दानधर्माला । गोरगरीब श्रीमंत भेदभाव नाहीं केला ॥ नजराणे कैक ते देती शिवरायाला ॥ **ईस्ट इंडिया कंपनीनं** दिला नजराणा त्याला । **हेन्री**

**ऑक्सिडन् टॉमस-रॉबिन्सन्** हे वकील आले दरबाराला ॥ **अन** भरदार नजराणा दिला ॥ राजानं केली मग तुला । १६००० **होन भार** भरली सुवर्णतुला । दानधर्म त्याचा मग केला । संतोष झाला सर्वाला **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ ३ ॥

रचना-२६-६-१९६१.